प्रा. बारबोले टी.एल.,
अर्थशास्त्र विभाग,
कन्या महाविद्यालय,
इचलकरंजी, जि:कोल्हापूर.

## -- प्रतिज्ञा पत्र --

मी प्रतिज्ञा पूर्वक निवेदन करतो की, हा संशोधन प्रबंध श्री शाहू छत्रपति मिल्स, कोल्हापूर मधील कापड कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास मी स्वत: संशोधित केला असून या पूर्वी हा शोध-प्रबंध कोणत्याही विद्यापिठीय स्तरावर कोणतीही पदवी वा पदविका मिळविण्यासाठी सादर करण्यात आलेला नाही.

(श्री.बारबोले टी.एल.)

कोल्हापूर :
दिनांक २८:५:-:१९८८ .

••

# प्र मा ण प त्र

कन्या महाविद्यालय, इचलकरंजी मधील श्री टी.एल. बारबोले यांनी एम.फिल्. पदवीसाठी " श्री शाहू छत्रपति मिल्स ( कोल्हापूर ) मधील कापड कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास " या शोध निबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे. हा शोध निबंध एम.फिल्.( अर्थशास्त्र ) या पदवीसाठी शिवाजी विद्यापीठाकडे सादर करण्यात येत आहे. सदर शोध निबंध अन्यत्र कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

संशोधन मार्गदर्शिका,

डॉ. लीला पाटील
कर्मवीर हिरे महाविद्यालय,
गारगोटी, जि: कोल्हापूर.

दिनांक २८-५-:५:१९८८.

..

## ।। ऋण निर्देश ।।

औद्योगिकरणामुळे देशाचा आर्थिक विकास होऊ लागलेला असला तरी त्याचे बरे वाईट परिणाम देशाच्या अर्थ व्यवस्थांवर होऊ लागले आहेत. विशेषात: उत्पादकतेशी निगडित असणाऱ्या श्रम ( कामगार ) या घटकांवर त्याचा प्रतिकूल परिणाम होऊ लागला आहे. नवीन तंत्रज्ञान ,नवीन यंत्रसामुग्री व उत्पादनाच्या नव-नवीन पध्दती इत्यादीमुळे जरी उत्पादनात भर पडत असली तरी त्याचे श्रम ( कामगार ) या घटकांवर प्रतिकूल परिणाम होत आहेत. उदा. बेकारी,अपघात इत्यादी . भारतातील कापड उद्योग हा महत्वाचा असला तरी अलीकडील काळात या उद्योगाला अतिशय बिकट परिस्थितीतून वाटचाल करावी लागत आहे. पर्यायाने या उद्योगात काम करणाऱ्या कामगारांना बिकट परिस्थितीतून वाटचाल करावी लागत आहे. म्हणजेच त्यांच्या आर्थिक व सामाजिक समस्यात एका अर्थाने भरच पडू लागली आहे असेच कोल्हापूर जिल्ह्याचे एक वेगळेपण व वैशिष्ट्यपूर्ण असणारी श्री शाहू छत्रपति मिल्स, कोल्हापूर मधील कापड कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास व्हावा या जाणीवेने एम.फिल.( अर्थशास्त्र) च्या अभ्यासासाठी निवड केलेली आहे.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर एम.फिल.(अर्थशास्त्र ) या पदवीसाठी सदरचा शोध निबंध सादर करताना मला अत्यानंद होत आहे. कारण एम.फिल(अर्थशास्त्र ) या पदवीच्या विषय निवडीपासून अखेर पर्यन्त माझे आदरणीय मार्गदर्शक, एक प्रसिध्द लेखिका, एक सामाजिक कार्यकर्त्या, गारगोटी येथील कर्मवीर हिरे महाविद्यालयाच्या कुशल उपप्राचार्या व अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ.श्रीमती लीला पाटील ह्या मला मार्गदर्शिका म्हणून लाभल्या हे मी माझे भाग्यच समजतो. त्यांच्या सखोल ज्ञानाने, कुशल मार्गदर्शनाने, व त्यांच्या क्रियाशील सहकार्यामुळे माझ्या शोध निबंधास उठावदारपणा आला. त्यांच्या क्रियाशील सहकार्यामुळे

मी हा शोध निबंध अल्प वेळेत पूर्ण करु शकलो, त्यामुळे त्यांनी केलेले मार्गदर्शन हे मौलिक अशाच प्रकारचे आहे, त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे.

प्रस्तुत प्रबंधासाठी शिवाजी विद्यापीठ, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. वि.बा. घुगे यांनी वेळोवेळी दिलेली प्रेरणा व सहकार्याबद्दल त्यांचे ऋण शब्दातीत आहेत. त्याच बरोबर याच विभागातील डॉ. जे.एफ. पाटील, डॉ. टी.जी.नाईक , डॉ.आर.आर. दोशी, डॉ.सौ.एस.बी.पंडित, प्रा.डांगे आदि विभूतींचे मनमोकळेपणाचे जे वैयक्तिक मार्गदर्शन लाभले त्या ऋणांचे आभार औपचारिकपणे मानण्याऐवजी त्या ऋणात राहणे मी माझे भाग्य समजतो.

या अभ्यासासाठी मा.प्राचार्या सौ. विजया पाटील, कन्या महाविद्यालय, इचलकरंजी, डॉ.एस.व्ही. पोवार व प्रा.सौ.पोवार, श्री राजर्षि शाहू कॉलेज, कोल्हापूर व प्रा. कु.एस.के.कोरे, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली या चतु:र्यांचा आदरपूर्वक उल्लेख करावा लागेल. त्यांची प्रेरणा व सहकार्य अविस्मरणीय आहे.

अभ्यास संदर्भात लेबर ऑफिसर श्रीयुत सुभाष जगदाळे व श्रीयुत डी. एस.पाडगांवकर, श्री शाहू छत्रपति मिल्स, कोल्हापूर व कार्यालयातील अन्य व्यक्तींनी मला जे बहुमोल सहकार्य केले म्हणूनच हा प्रबंध आज पूर्ण होत आहे.

हा प्रबंध लिहिताना प्रा.एस.आर.बंग, अर्थशास्त्र विभागप्रमुख ,विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर व प्रा. बी.के.लवटे ,अर्थशास्त्र विभागप्रमुख कन्या महाविद्यालय, इचलकरंजी यांनी मला ज्या प्रेरणा व सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

याच बरोबर अर्थशास्त्र विभागातील लेखनिक श्री.एम.जे. पाटील व श्री दिंडे यांचाही महत्वाचा सहभाग आहे.

हा प्रबंध सुंदर, सुबक व कमी वेळेत पूर्ण करुन देण्यात श्री बाळकृष्ण रा.सावन्त, यांचा मोलाचा वाटा आहे, त्यांचा मी अत्यंत आभारी आहे.

कोल्हापूर :

दिनांक :२८ ५ :१९८८.

( श्री.बारबोले टी.एल. )

••